# ज्ञान प्रबोधिनी
# नेतृत्व संवर्धन केंद्र

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

## सौर शके १९४६ (एप्रिल २०२४ ते एप्रिल २०२५)


०२० - २४२०७१७९

leadershipfc@jnanaprabodhini.org

netrutwavikas.jnanaprabodhini.org

# अनुक्रमणिका


- कार्यसंकल्प
  - पूर्ण
  - अपूर्ण
- प्रशासकीय नेतृत्व विकसन
  - जिज्ञासा १९ व आकांक्षा ११ - उपक्रम आढावा
  - अन्य उपक्रम
- सामाजिक नेतृत्व विकसन
  - अग्रदूत प्रकल्प
  - इतर कार्यक्रम / उपक्रम
- कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र
  - माहिती आणि उद्दिष्ट
  - विशेष कार्यक्रम
- युवोन्मेष
- संशोधन प्रकल्प सादरीकरण व जापान दौरा

# कार्यसंकल्प

## पूर्ण

- पुणे जिल्ह्यातील २० महाविद्यालयांमध्ये संकल्प व्याख्यानमाला, नेतृत्व विषयक कार्यशाळा/ प्रशिक्षण कार्यक्रम घेऊ. त्या आधारे किमान १००० जणांपर्यंत पोहचू.

- अग्रदत या प्रकल्पातील पुणे जिल्ह्यातील ५०० युवक, युवती सहभागी होतील यासाठी प्रयत्न करून त्यातील निवडक सहभागींसाठी चार टप्प्यांची (स्पधा, प्रशिक्षण शिबीर, सामाजिक प्रकल्प, आंतर्वासिता इ.) प्रशिक्षणाची योजना करू.

- दोन महाविद्यालयांमध्ये निवडक विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन क्रेडिट्सचा (३० तासांचा) सामाजिक नेतृत्व प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवू.

- फाऊंडेशन व प्रीपेरेटरी वर्ग जिज्ञासा-१९ (सहभागी संख्या- ४५) व आकांक्षा-११ (सहभागी संख्या- २०) या तुकड्या चालवू.

- किमान दोन महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा परिचय कार्यशाळा घेऊ.

- २० ते २३ वयोगटातील किमान २० माजी विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व प्रशिक्षणाच्या २ कार्यशाळा/ शिबिरे घेऊ. तसेच नित्य उपक्रमांमध्ये किमान १० माजी विद्यार्थी संयोजनात जबाबदारी घेऊन सहभागी होतील यासाठी प्रयत्न करू.

# कार्यसंकल्प

## पूर्ण

- प्रशिक्षण वर्गातील कौशल्यांच्या उपयोजनासाठी संकल्प व्याख्यानमाला, ग्रेट-भेट मुलाखत स्पर्धा, एक दिवसीय अभ्यास सहली, इ. च्या माध्यमातून ५०० युवक, युवांतींपर्यंत पोहचू.

- वरील अभ्यासक्रम वापरून सहा महिन्यांचा प्राथमिक प्रशिक्षण वर्ग (प्रत्यक्ष व दूरस्थ अशा मिश्र पद्धतीने) घेऊ. यामध्ये २५ जण सहभागी होतील यासाठी प्रयत्न करू.

- विभागातील सदस्यांचे प्रभोदिनी नेतृत्व संकल्पना व तत्त्वज्ञान परिचय यासंबंधी द्वैमासिक कार्यशाळा/ बैठकी/ व्याख्याने/ गप्पा यांचे कार्यक्रम घेऊ.

- सदस्यांसाठी साप्ताहिक उपासना, मासिक बैठक व वार्षिक सहल आयोजित करू.

- 'युवोन्मेष' नियतकालिक चालवू. त्या माध्यमातून १००० जणांशी नियमित संपर्क ठेवू. या नियतकालिकाचा दिवाळी अंक तयार करून १००० प्रतींची विक्री करू.

# कार्यसंकल्प

## पूर्ण

- कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र सर्व सुविधांनिशी कार्यरत होईल यासाठी आवश्यक निधी संकलन करू व हे केंद्र वार्षिक १५० दिवस (प्रबोधिनी अंतर्गत गटांसाठी, नेतृत्व संवर्धन केंद्राद्वारे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी व बाहेरील संस्थांद्वारा होणाऱ्या कार्यक्रमासाठी प्रत्येकी ५० दिवस) वापरते होईल यासाठी प्रयत्न करू.

- स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या किमान ३५ माजी विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन अभ्यासिका चालवू.

- ३० ते ५० वयोगटातील अध्यापकांसाठी नेतृत्वगुण विकसनाचा अभ्यासक्रम तयार करू.

# कार्यसंकल्प

## अपूर्ण

- पहिल्या दोन उद्दिष्टांच्या उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या युवक, युवतींसाठी जाणीव/ सामाजिक प्रकल्प भेटी या शीर्षकाखाली सामाजिक जाणीव विकसित करणारे कृतिकार्यक्रम घेऊ. यामध्ये किमान १०० जण सहभागी होतील यासाठी प्रयत्न करू.

- सामाजिक क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया करून २-२ महिन्यांचे क्रमान्वित २ अभ्यासवर्ग शिष्यवृत्ती देऊन प्रायोगगक स्तरावर राबवू. यामध्ये किमान ५० जण सहभागी होतील यासाठी प्रयत्न करू.

- प्रभोधिनीत किमान ३ वर्षे जबाबदारी घेऊन काम केलेल्या सदस्यांसाठी २ दिवसांच्या २ कार्यशाळा घेऊ. (प्रत्येक कार्यशाळेत सुमारे १५ ते २० सदस्य सहभागी होतील)

- संघटनात्मक नेतृत्व प्रशिक्षणाच्या विषयांच्या अभ्यासक्रमाचे संकलन केलेली पुस्तिका तयार करू.

- विभागातील सदस्यांसाठी नेतृत्व विषयक सत्रे प्रभावीपणे घेता येण्यासाठी वर्षातून १ कार्यशाळा घेऊ. गरजेनुसार सदस्यांना बाह्य संस्थांमध्ये प्रशिक्षणाची संधी देऊ.

- प्रत्येक सदस्याचा रु. २ लक्ष रकमेचा आरोग्यविमा काढण्यासाठी आग्रह धरू. एकूण हप्त्यापैकी काही रक्कम विभागातर्फे भरू.

- नेतृत्व विषयक पुस्तकांचे व नियतकालिकांचे ग्रंथालय चालू करू.

# प्रशासकीय नेतृत्व विकसन

नेतृत्व संवर्धन केंद्रातर्फे २०१३ पासून नेतृत्व पायाभरणी व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम राबवला जातो. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची (जिज्ञासा) १९ वी तुकडी व दुसऱ्या वर्षाची (आकांक्षा) ११ वी तुकडी या वर्षी पूर्ण झाली.





- **स्पर्धा परीक्षा तयारी (प्रिपरेटरी) भाग आढावा**

| विषय | जिज्ञासा १९ | आकांक्षा ११ |
|---|---|---|
| सामान्य अध्ययन व CSAT | ८७ | ११५ |
| सद्य घडामोडी | ३१ | २७ |
| UPSC परीक्षा परिचय | १६ | १३ |

- **नेतृत्व विकसन (फाउंडेशन) सत्र आढावा**

| विषय | जिज्ञासा १९ | आकांक्षा ११ |
|---|---|---|
| नेतृत्व कौशल्ये | २० | ०७ |
| व्यक्तीमत्त्व विकसन/प्रबोधिनी परिचय | १४ | ७ |
| प्रतिभा विकसन | १० | १० |
| उपक्रम तयारी | १८ | १० |

# प्रशासकीय नेतृत्व विकसन

## उपक्रम आढावा

### जिज्ञासा १९

- राजगड रात्र सहल
- नेतृत्व संवर्धन शिबिर
- साहस शिबिर
- ग्रामीण परिचय शिबिर
- व्यक्तीकार्ये, जोडीकार्ये



### आकांक्षा ११

- तालुका अभ्यास सहल (भोर,सुधागड,बारामती)
- नेतृत्व संवर्धन शिबिर २
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार अभ्यास शिबिर
- गिरीभ्रमण सहल
- गटकार्ये, मुलाखती घेणे





समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# प्रशासकीय नेतृत्व विकसन

## उपक्रम आढावा

### प्रतिभा विकसन विषय सत्र मालिका

- २ तासांची एकूण १० सत्रे अडीच महिन्यात पूर्ण झाली.
- विषयाची ओळख, व्याप्ती, कृतीसत्रे व सराव व गृहपाठ इ. तंत्राद्वारे हि सत्रे घेतली गेली.

### नेतृत्व संवर्धन शिबिर मुख्य तपशील

- शिबिरात जिज्ञासा १९ व आकांक्षा ११ वर्गातील अनुक्रमे **३२** व **१५** असे एकूण ४७ शिबिरार्थी व ६ मार्गदर्शक सहभागी झाले होते.





समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# प्रशासकीय नेतृत्व विकसन

## उपक्रम आढावा

- नेतृत्व संवर्धन शिबिर- समाविष्ट विषय व वक्ते यांची यादी

| जिज्ञासा १९ वर्ग | विषय व प्रशिक्षक/ वक्ते | आकांक्षा ११ | विषय व प्रशिक्षक/ वक्ते |
|---|---|---|---|
| Need & Scope of Leadership | Suraj Pale and Saugandh Deshmukh | Revision of all Leadership camp sessions | Mr. Mahendrabhai |
| Event Management | Amit Kadam | Conflict Resolution, Giving & Receiving feedback | Mr. Mahendrabhai |
| Experience Sharing by Mrs.Bagehsree tai & Dwarkatai | | | |
| Team Work | Saugandh Deshmukh | Transactional Analysis (W) | Mr. Sharadrao Sunkar |
| Johari Window (W) | Mr. Mahendrabhai | Leadership Enduro (W) | Amit Kadam & Tatyasaheb Gardade |
| Decision Making (W) - | Mrs.Suvaranatai Gokhale | Vision Building & Goal Setting | Mr. Nachiket Nitsure |
| | | Values of Leadership | Mr. Mahendrabhai |
| | | TED Talks & Vaicharik Baithak | Saugandh Deshmukh |

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# प्रशासकीय नेतृत्व विकसन

## अन्य उपक्रम

- गणेशोत्सवानिमित्त वैचारिक व्याख्यान व विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम.
    - विषय : भारतातील शेती व शेतकरी : प्रश्न आणि संभाव्य उत्तरे

- पोलीस मित्र उपक्रम
    - जिज्ञासा वर्गातील अनुशिका पाटील या विद्यार्थिनीने पुढाकार घेऊन पोलीसमित्र हा उपक्रम घडवून आणला. या उपक्रमात जिज्ञासा १९ वर्गातील १० विद्यार्थिनी व ४ विद्यार्थी असे एकूण १४ विद्यार्थी सहभागी झाले होते. गणेशोत्सवामध्ये केसरी वाडा, शनिपार चौक, कुमठेकर रस्ता अशा ३ ठिकाणी एकूण ३ दिवसात मिळून १४ तास रहदारी नियंत्रणाचे काम पूर्ण केले.








# सामाजिक नेतृत्व विकसन

# अग्रदूत प्रकल्प

- नेतृत्वाच्या क्षमता आणि नेतृत्व करण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती शोधणे, त्यांच्या क्षमता वाढवणे, त्यांच्यात सामाजिक जाणीव विकसित करणे व त्याद्वारे त्यांनी आपापल्या क्षेत्रात नेतृत्वाचे नमुने उभे करणे हा या अग्रदूत प्रकल्पाचा म्हणजेच नेतृत्व संवर्धन प्रकल्पाचा हेतू आहे.

- याच हेतूने एका वर्षाच्या कालावधीत स्पर्धा, शिबिर, सामाजिक प्रकल्प, अंतर्वासिता (Internships) व अभ्यास सहल या पाच टप्प्यांत नेतृत्व विकासाची ही प्रक्रिया गतिमान केली गेली होती.







# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

## प्रकल्पाचे टप्पे व तपशील

| टप्पा | उपक्रम | कालावधी | वेळेची गुंतवणूक | उद्दिष्ट |
| --- | --- | --- | --- | --- |
| १.१ | एकट्याने आव्हान पूर्ण करणे (स्पर्धा) | सप्टेंबर - ऑक्टोबर | एका दिवसात ६ तास | आव्हान घेऊन काम पूर्ण करता येणे |
| १.२ | गटकार्य कौशल्य (कार्यशाळा) | | १ दिवस ४ तास | • दिलेल्या विषयावर गटात चर्चा करणे<br>• गटाने दिलेले काम पूर्ण करणे |
| २ | नेतृत्व प्रशिक्षण शिबिर | डिसेंबर - जानेवारी | ८ दिवस निवासी | पुढील उपक्रमांना पूरक आणि नेतृत्व विकसनासाठी अपेक्षित प्रशिक्षण योजणे. |
| ३ | सामाजिक समस्यांवर कल्पक उपाय सुचवणे व समस्यांच्या उपायांवर कार्यवाही | फेब्रुवारी - मार्च | १ महिना | प्रत्यक्ष सामाजिक समस्यांना कल्पक उत्तरे शोधण्याचा अनुभव घेणे व नेतृत्व आणि कार्यवाहीच्या क्षमता प्रत्यक्ष आजमावून बघण्याची संधी मिळणे. |
| ४.१ | सामाजिक नेतृत्वासोबत सामाजिक संस्थेत काम करण्याची संधी (अंतर्वासिता) | मे - जुलै | १ महिना | सहवासातून प्रेरणा जागरण आणि वृत्तीघडणीला सुरुवात. |
| ४.२ | सामाजिक प्रकल्पांची अभ्यासरहल | | ४ दिवस | पुढील वाटचालीबाबत विस्तृत चर्चा |

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

## प्रकल्पाचे टप्पे व तपशील

| क्र. | जबाबदारी / पद | सदस्याचे नाव |
|---|---|---|
| ०१. | प्रकल्प मार्गदर्शक | प्रा. महेन्द्र सेठिया |
| ०२. | प्रकल्प प्रमुख | वाच. सौगंध देशमुख |
| ०३. | आशय समन्वयक | श्री. संकेत भंडारे |
| ०४. | जिल्हा समन्वयक (केंद्र १, पुणे) | कु. राजेश्वरी मंडगे |
| ०५. | जिल्हा समन्वयक (केंद्र २, पिंपरी-चिंचवड) | कु. ज्योती खरे |
| ०६. | संशोधन समन्वयक | श्री. मोहक कुऱ्हाडे |
| ०७. | युवोन्मेष मासिक समन्वयक | श्री. हनुमान मेकडे |





- **सहभागी गट** - विविध महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्थानिक पातळीवरील नेतृत्व करू शकणारे १८ ते २४ वयोगटातील युवक, युवती या प्रकल्पात सहभागी झाले.
- **प्रचार पद्धती** - प्राचार्य, प्राध्यापक, NSS प्रमुख, संस्था प्रमुख/ कार्यकर्ते यांच्या माध्यमातून क्षमतावान युवक-युवतींच्या शिफारसी घेणे, प्रत्यक्ष युवा गटापर्यंत पोहोचणे, त्यांना प्रत्यक्ष प्रकल्पात सहभागी होण्यासाठी आवाहन करणे, त्यांच्यासाठी १ तासाच्या कार्यशाळेचे आयोजन करणे व त्या माध्यमातून अग्रदूत प्रकल्पाची ओळख व त्यात सहभागी होण्यासाठी आवाहन करणे. याच बरोबर वृत्तपत्र, सोशल मिडिया यावरील प्रसार अशा विविध प्रकारे हा प्रकल्प अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल याचे प्रयत्न करण्यात आले.

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

## टप्पा-१ : आव्हानात्मक व्यक्तिकार्य स्पर्धा व नेतृत्व प्रशिक्षण कार्यशाळा

### फेरी १ : आव्हानात्मक व्याक्तिकार्य स्पर्धा

या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना पुढील ४ प्रकारची कामे देण्यात आली होती;

- सार्वजनिक स्वच्छता
- सर्वेक्षण करणे
- सार्वजनिक ठिकाणी लोकांना गोळा करून भाषण करणे
- विक्री करून नफा मिळवणे

वरील चारही प्रकारांप्रमाणे शहरातील विविध ठिकाणी ३ तास जाऊन काम करणे असे स्पर्धेचे स्वरूप होते. त्यापूर्वी प्रबोधिनीचा व प्रकल्पाचा परिचय स्पर्धकांना करून दिला. काम करून परत आल्यावर आढावा लेखन, अनुभव कथन, बक्षीस वितरण व समारोप असे दिवसभराचे वेळापत्रक होते.

- **पुणे व पिंपरी चिंचवड**

दि. ०१ सप्टेंबर रोजी स. १० ते दु. ५ या वेळात  पुण्यातील व निगडीतील ज्ञान प्रबोधिनीच्या वास्तूंमध्ये गट जमवून व्याक्तिकार्य स्पर्धा पार पडली.

- **बारामती व शिरूर**

दि. २९ सप्टेंबर रोजी स. १० ते दु. ५ या वेळात शिरूरमध्ये सी. टी. बोरा महाविद्यालय व बारामतीमध्ये टी. सी. महाविद्यालयात ही आव्हानात्मक व्यक्तिकार्य स्पर्धा पार पडली.

- **राजगुरुनगर व खंडाळा (पारगाव)**

दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत खंडाळा (पारगाव) येथील सुशीला शंकरराव गाढवे महाविद्यालयात आणि दुपारी १.०० ते ५.०० या वेळेत चैतन्य संस्था, महिला प्रशिक्षण व संसाधन केंद्र, राजगुरुनगर येथे व्यक्तीकार्य स्पर्धा आयोजित करण्यात आली.

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

- सहा केंद्रावरील स्पर्धांचे संख्यात्मक आढावा

| तपशील | पुणे | पिंपरी-चिंचवड | बारामती | शिरूर | राजगुरुनगर | खंडाळा (पारगाव) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्धेस उपस्थित संख्या | ४६ | १२ | १४ | १४ | २० | १२ | ११८ |
| बक्षीसप्राप्त स्पर्धक | २७ | १२ | ०९ | ०७ | ०९ | ०९ | ७३ |
| संयोजक गट | ०८ | ०७ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | |

या फेरीतील बक्षीस प्राप्त स्पर्धकांसाठी दूसरा टप्पा म्हणून ४ तासांच्या नेतृत्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

### फेरी २ : नेतृत्व प्रशिक्षण कार्यशाळा

- या कार्यशाळेचे संख्यात्मक तपशील पुढीलप्रमाणे आहेत –

| तपशील | पुणे केंद्र | पिंपरी-चिंचवड केंद्र | बारामती केंद्र | शिरूर केंद्र | राजगुरुनगर | खंडाळा (पारगाव) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पात्र संख्या | ४० | २७ | ३६ | २१ | - | - | १२४ |
| उपस्थित संख्या | ३४ | २१ | ३३ | १७ | २५ | ३३ | १६३ |
| शिबिरासाठी निवड | २६ | १८ | २८ | १३ | ०९ | १० | १०४ |

फेरी २ नंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी टप्पा २ च्या शिबिरात सहभाग घेतला.





समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

## टप्पा २ : निवासी नेतृत्व प्रशिक्षण शिबिर - [भाग १ व भाग २]

या शिबिराचा आशय मुख्य ६ उद्दिष्टांभोवती गुंफलेला होता –

| अनु. क्र | उद्दिष्ट | सत्र क्रमांक | सत्र | वक्ते |
|---|---|---|---|---|
| १. | सामाजिक प्रश्न आणि त्यातील नेमकेपणा समजून घेणे | १. | समस्यांचा शोध कसा घ्यावा? | संकेत भंडारे |
| | | २. | सर्वेक्षणाची तंत्रे | मा.महेंद्रभाई सेठिया |
| | | ३. | गावातील प्रत्यक्ष भेटी | संकेत भंडारे |
| २. | नेतृत्वाच्या काही गुण, कौशल्यांची ओळख होणे (कृती सत्र ) | १. | संवाद कौशल्य | डॉ.सौगंध देशमुख व मा.क्षमा दातार |
| | | २. | Self-Mapping and Confidence Building | शिबिर १.१. मा.नचिकेत नित्सुरे शिबिर१.२. डॉ.अनघा लवळेकर |
| | | ३. | नेतृत्व गुण आणि त्यांचे विकसन | ज्योती खरे व संकेत भंडारे |
| ३. | सामाजिक कामाची प्रेरणा जागृत होणे (शिबिर टप्पा १ व टप्पा २) | १. | अनुभव कथन (सामाजिक समस्या सापडल्यापासून तिच्या उत्तरापर्यंतचा प्रवास) | मा.गीतांजली ताई |
| | | २. | अनुभव कथन (समाजाचे नेतृत्व आणि त्यामुळे बदललेला समाज याचे अनुभव) | मा.बाळासाहेब कोळेकर |
| | | ३. | सामाजिक नेत्यांच्या गोष्टींचे वाचन | कु.राजेश्वरी मंडगे |
| | | ४. | प्रकट वाचन ( जोनाथन सीगल ) | मा.महेंद्र भाई सेठिया |
| | | ५. | सामाजिक कार्यकर्त्यांबरोबर गप्पा | मेथिनी डिंगरे, निलांगी नानाल, प्रवीण कदम |
| | | ६. | चीत्रापट्टीका पाहणे आणि चर्चा | ज्योती खरे |
| ४. | नेतृत्व व कौशल्यांचे प्रशिक्षण | १. | स्व व्यवस्थापन (SWOT, समय व्यवस्थापन ) | मा.आदित्य शिंदे |
| | | २. | नियोजन कौशल्य | संकेत भंडारे व सुरज पाल |
| | | ३. | गटकार्य- संघटना | डॉ. सौगंध देशमुख |
| ५. | सामाजिक प्रश्न आणि नेमकेपणा | १. | प्रस्ताव लेखन | मा. सुभाषराव देशपांडे |
| | | २. | सामाजिक प्रकल्प नियोजन | संकेत भंडारे |
| | | ३. | कल्पक समस्या परिहार | मा. महेंद्रभाई सेठिया व क्षमा दातार |
| ६. | अभ्यास देशस्थितीचा | १. | सामाजिक प्रकल्प संकल्पना | मा.महेंद्रभाई सेठिया |
| | | २. | संघ संघटनांकडे कसे बघावे | मा. डॉ. विवेक कुलकर्णी |
| ७. | उपक्रम ( शिबिर भाग १ ) | १. | तोरणा ट्रेक | संकेत भंडारे |

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

## कार्यपद्धती व निरीक्षणे



शिबिर कार्यपद्धतीतील वैशिष्ट्ये –

- व्यायाम व उपासना
- क्रीडा दल
- पथक रचना
- जबाबदाऱ्यांचे वाटप

शिबिरा दरम्यानची निरीक्षणे –

शिबिरादरम्यान सहभागींची पुढील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षणे नोंदविण्यात आली -

१. पुढाकार
२. सहभाग
३. सर्जनशीलता
४. भावनिक व्यवस्थापन
५. स्व-व्यवस्थापन
६. आत्मविश्वास










समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

### टप्पा ३ : सामाजिक प्रकल्प

निवासी नेतृत्व शिबीर पूर्ण केलेल्या सहभागी सदस्यांची निवड ही टप्पा-३ सामाजिक प्रकल्पा साठी करण्यात आली. २५ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२५ या कालावधीत हा टप्पा पार पडला, या प्रकल्पाचे स्वरूप हे पाच सदस्यांचा मिळून एक गट मिळून हा प्रकल्प पूर्ण करतील असे ठरविण्यात आले, त्या गटात किमान १ व जास्तीत जास्त २ सदस्य हे अग्रदूत प्रकल्पातील असतील व उर्वरित सदस्य हे इतर, मात्र १८ ते २५ या वयोगटातील असतील असे ठरविण्यात आले, सामाजिक प्रकल्पासाठी २० विद्यार्थ्यांनी एकूण १४ सामाजिक प्रकल्पांचे प्रस्ताव वैयक्तिक निवड करून दिले.

सामाजिक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सदस्यांची नावे :

| सहभागी सदस्य क्र.१ | सहभागी सदस्य क्र.२ | प्रकल्पाचा विषय |
|---|---|---|
| कुणाल धोंडगे | तेजस सावंत | शिक्षण क्षेत्र: वंचित मुलांचे मुलभूत कौशल्य विकास |
| अदिती नागवे | स्नेहल रोडगे | शिक्षण क्षेत्र: वास्तीभागातील मुलांचे इंग्रजी भाषा कौशल्य विकास |
| अनिकेत बनसोडे | | शिक्षण क्षेत्र: वस्ती भागातील मुलांची शिक्षणाची गोडी वाढवणे |
| मृणाल नगरकर | अथर्व जोशी | राष्ट्र प्रेम : शालेय मुलांमध्ये स्वदेशी गोष्टीचा वापर याबाबत आवड निर्माण करणे |
| वर्षा भोईवाडे | | शिक्षण क्षेत्र: अप्रगत मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे |

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

सामाजिक प्रकल्प निवडीचे निकष :

- जनजागृती
- कार्यक्रम
- उपक्रम (१५ तास)
- निबंध लेखन किंवा एक दिवस समाज सेवकांसोबत

प्रकल्प करताना ह्या चार पायऱ्या पूर्ण केल्या आहेत का, तसेच प्रकल्प सादरीकरण कशाप्रकारे केले आहे, ह्या मुद्द्यांच्या आधारे सहभागी सदस्याची **टप्पा-४ अंतर्वासितेसाठी (Internship)** निवड करण्यात आली.










- **टप्पा ४ साठी निवड झालेले सहभागी सध्या मे ते जुलै या कालावधीत पार पडणाऱ्या अंतर्वासितेमध्ये सहभागी आहेत.**

# सामाजिक नेतृत्व विकसन

## अग्रदूत प्रकल्प

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

## सहभागी सदस्यांचे प्रतिसाद

### अग्रदूत टप्पा १-

- "शिबिराचा नेतृत्व गुण विकसित करण्याचा उद्देश काही अंशी पूर्ण झाला असे वाटते. स्व-परीक्षण करता आले आणि स्वतःमधील सुप्त गुण कोणते हे ही काही प्रमाणात समजले." – स्नेहल रोडगे
- "शिबिरातील गीतांजली देवगावकर यांच्या अनुभव कथनातील एक वाक्य स्मरणात राहिले, की आपल्याला दररोज का ही नवीन आव्हानाला सामोरे जायचे आहे त्यासाठी आपण सदैव कृतीशील राहिले पाहिजे. नवीन अनुभव घेतले पाहिजेत. या शिबिरात मला अशा अनेक गोष्टी मिळाल्या ज्या मला शाळा-कॉलेजमध्ये मिळाल्या नाहीत." – प्रतीक बर्गे

### अग्रदूत टप्पा २-

- "मागच्या शिबिरामध्ये आम्हाला समाज कार्य काय असते हे समजल, या शिबिरात हे कार्य भारत देशासाठी किती गरजेच आहे हे समजले" – तेजस सावंत
- "वेगवेगळ्या ठिकाणी लेक्चर होतात आपण ऐकतो आणि विसरतो पण अग्रदूत मध्ये आम्हाला विचार करायला मिळतो त्यामुळे व्यवस्थित समजायला मदत होते." – वर्षा भोईवाड

### अग्रदूत टप्पा ३-

- "समाज साठी काहीतरी करायला मिळाला याचा समाधान मिळाला. माझ्या काम मधून संतुष्टी (satisfaction) मिळाला, मी काहीतरी मूल्यवर्धन (value add) करू शकले, मदत करू शकले, म्हणून चांगल वाटलं." – अदिती नागवे

-

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

# सामाजिक नेतृत्व विकसन

## इतर कार्यक्रम / उपक्रम

- सामाजिक नेतृत्व विषयाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी म्हणून २१ एप्रिल रोजी एका दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत नेतृत्वगुणांची ओळख करून देणारे खेळ/ कृती, 'अमूल' प्रकल्पाचा समाजावर झालेला परिणाम यावर आधारित केस स्टडी, प्रबोधिनीचा परिचय, कृतज्ञता पत्र लेखन आणि एक सामाजिक शॉर्ट फिल्म पाहून त्यावर चर्चा अशी सत्रे घेण्यात आली होती.

- मुक्त विद्या केंद्राच्या बैठकीदरम्यान 'Foundation of Leadership Development for Social Change and Entrepreneurship' या नावाचा कोर्स सादर करण्यात आला होता. एकूण ३० तासांचा आणि २ क्रेडिट्सचा असा हा कोर्स आहे. महाविद्यालयात आयोजित केलेली कार्यशाळा, जाणीव उपक्रम, प्रबोधिनीत झालेली एक दिवसाची कार्यशाळा आणि संस्थाभेट दौरा अशा विविध उपक्रमांचा समावेश करून हा कोर्स तयार करण्यात आला होता. आत्तापर्यंत VIT मधील दोन शिक्षक आणि COEP महाविद्यालयात या कोर्सविषयी भेटून माहिती देण्यात आली होती.

- "Leadership for Social Change" या विषयावर PVG अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रेडिट कोर्स सुरू करण्यात आला होता. या कोर्सची संकल्पना संकेत दादा भंडारे यांची होती. 'Principle - Centered Leadership: Leadership for Social Change' या नावाने २० तासांचा क्रेडिट कोर्स PVG मध्ये सुरू करण्यात आला होता. हा कोर्स एकूण १० सत्रांमध्ये विभागलेला होता, आणि प्रत्येक सत्र २ तासांचे होते. एकूण ५७ विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी नोंदणी केली होती.

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र

सर्व सामाजिक-आर्थिक, प्रादेशिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या हजारो संभाव्य नेत्यांच्या प्रशिक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही आमच्या कामाची व्याप्ती वाढवण्याची योजना आखली आहे. २०२४ पासून आम्ही विविध कार्यक्रमांद्वारे नेत्यांना प्रशिक्षण देण्यासाठी केंद्राचा वापर सुरू केला.

**पुढील १० वर्षांसाठी आमची उद्दिष्टे:**

- विविध क्षेत्रांमध्ये १५० सामाजिक नेत्यांना प्रशिक्षण देणे आणि विकसित करणे.
- ५ स्वयंसेवी संस्थांमध्ये १०० नेत्यांना प्रशिक्षण देणे आणि विकसित करणे.
- शिक्षक नेत्यांसाठी प्रशिक्षण मॉड्यूल तयार करणे.
- ग्रामीण आणि वंचित तरुणांसाठी नेतृत्व कार्यक्रम आयोजित करणे.






समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र

केंद्र मध्ये विविध संस्थांच्या वतीने पुढील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

| | संख्या | दिवस |
|---|---|---|
| नेतृत्व संवर्धन केंद्र आयोजित (A) | १८५ | २१ |
| ज्ञान प्रबोधिनीच्या इतर विभागांचे (B) | २७०८ | ८३ |
| अन्य संस्था / संघटना (C) | ६०० | ३४ |
| | ३४९३ | १३८ |









समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र

## विशेष कार्यक्रम

- दिनांक ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याला वास्तूशांती व मातृभूमी पूजन कार्यक्रम.
- दिनांक २७ मे २०२४ रोजी आयोजन संस्था, School of Architecture and Design, वारावडी (पुरंदर) पुणेच्या दोन सदस्यांनी भेट दिली.
- दिनांक ६ जून २०२४ रोजी स्व-रूपवर्धिनी संस्थेतील सदस्यांनी ज्ञान प्रबोधिनी, वेल्हे केंद्राला भेट दिली.
- दिनांक ६ जुलै २०२४ रोजी सेवांकुर भारत संस्थेतील कार्यकर्त्यांनी भेट दिली.
- दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजरोहनाचा कार्यक्रम झाला. स्थानिक कार्यकर्ते व सहनिवासातील मुली सहभागी होते.
- दिनांक १७ ऑगस्ट रोजी कै. डॉ. आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सगळ्यांनी मिळून विनम्र अभिवादन केले.
- ज्ञान प्रबोधिनी - शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभागातील कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीची प्रथम, द्वितीय व तृतीय प्रतिज्ञा घेतली.
- ज्ञान प्रबोधिनीचे वेल्हे परिसरातील कार्यकर्ते, सहनिवासात राहणाऱ्या मुली, स्थानिक कार्यकर्ते, गावकरी आणि गांधर्व महाविद्यालयाच्या सदस्यांनी मिळून अभंग गायनाचा कार्यक्रम सादर केला.
- दिनांक ३० एप्रिल रोजी राजगड (वेल्हे) तालुक्यातील रुळे गावातील सुपुत्र असलेले शिवांश जागडे जे भारतभरातून २६व्या क्रमांकांनी यूपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा आपल्या ज्ञान प्रबोधिनी भवन, वेल्हे येथे संपन्न झाला.

# युवोन्मेष

## नेतृत्व विषयाला वाहिलेले युवा गटासाठीचे प्रायोगिक मासिक

सत्कार्याचे व्यसन आपल्यापैकी प्रत्येकालाच लागायला हवे — म्हणूनच सर्वांसाठीच 'युवोन्मेष' हे व्यासपीठ. या युवोन्मेष मासिकाच्या माध्यमातून नेतृत्व गुण कोणत्या प्रकारचे असायला हवेत? स्वतःच्या नेतृत्वगुणांचे संवर्धन केलेल्यांचे अनुभव कथन, वेगळ्याच प्रकारचे कार्य करून समाजिक बदलाचा ठसा उमटविणाऱ्यांचे अनुभव कथन या प्रकारचे लेख असतील. याच्या बरोबरीने काव्य, छोटा लेख, चित्रकला, चित्रफित या प्रकारच्या कलाकृती सादर व प्रसिद्ध करण्यासाठीही संधी आहेच.

या मासिकात तरुण नेत्यांना प्रगतीसाठी प्रेरणा देणाऱ्या विविध कथा आणि लेखांचा समावेश आहे. हे मासिक ३ विभागांमध्ये विभागले गेले आहे, ते म्हणजे, नेतृत्व गुण विषय, सीमोल्लंघन आणि कर के देखो.

- **नेतृत्व गुण विषय**:

हा विभाग तरुण नेत्यांना चांगल्या नेत्याचे गुण समजून घेण्यास मदत करतो. या वर्षी या विभागात नेतृत्वासाठी मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व, संघ बांधणी, अभ्यासशीलता यासारख्या विषयांवर विविध लेखांचा समावेश होता. प्रबोधिनीने आयोजित केलेल्या शिबिरे आणि सत्रांच्या माध्यमातून आवश्यक नेतृत्व कौशल्ये आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांची काही उदाहरणे सादर करण्यात आली. या शिक्षणात एकतेचे महत्त्व आणि शक्ती, स्वावलंबन आणि वाढीसाठी परस्पर अवलंबित्व यासारखे विषय समाविष्ट होते.

समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

# युवोन्मेष

## नेतृत्व विषयाला वाहिलेले युवा गटासाठीचे प्रायोगिक मासिक

- **कर के देखो**:

मासिकाचा हा भाग आमच्या वाचकांना आमच्या सदस्यांना आलेल्या विविध अनुभवांबद्दल आणि त्यांनी घेतलेल्या शिकवणींबद्दल माहिती देण्यासाठी समर्पित आहे. या वर्षी, आम्ही अरुणाचल प्रदेशातील लपलेल्या प्रतिभेचा शोध, 'मॅडम कमिशनर' यांच्या प्रेरणादायी चरित्रातून मिळालेले धडे, हिमालयातील रोमांचक अनुभवांचे तपशीलवार वर्णन, तसेच आयोजित कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना मिळालेल्या अंतर्दृष्टींबाबतचे लेख समाविष्ट केले. या लेखांमागील मुख्य कल्पना होती — काहीही करण्याची क्षमता आणि नवीन गोष्टी धाडसाने करण्याची प्रेरणा.

- **सीमोल्लंघन**:


मासिकाचा हा विभाग तरुण नेत्यांना त्यांचे क्षितिज विस्तारण्यास, विकासाच्या नवीन स्तरांवर पोहोचण्यास, तसेच विविध व्यासपीठांवरून शिकत उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतो. यावर्षी या विभागात 'एका दिशेचा शोध' या प्रेरणादायी पुस्तकातून मिळालेल्या वैयक्तिक विकासाच्या अनुभवांवर आधारित लेख समाविष्ट करण्यात आले. याशिवाय, राजगड ट्रेक, सीमेवरील भेट आणि अरुणाचल प्रदेशातील प्रकल्पातील चिंतन व शिकवणुकींचाही समावेश होता.

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# युवोन्मेष

## नेतृत्व विषयाला वाहिलेले युवा गटासाठीचे प्रायोगिक मासिक

या वर्षाचा खास दिवाळी विशेषांक




**युवोन्मेष चे लेख वाचण्यासाठी QR CODE SCAN करा**

# संशोधन प्रकल्प सादरीकरण व जापान दौरा

ज्ञान प्रबोधिनीच्या पाच सदस्यांनी दि. १७ ते २० ऑगस्ट दरम्यान झालेल्या Asia-Pacific Conference on Giftedness या परिषदेसाठी ताकामात्सू, जापान येथे प्रवास झाला. नेतृत्व संवर्धन केंद्रातील वर्गांचा परिणाम मांडणारे संशोधन या परिषदेत सादर करण्याची संधी मिळाली. यानिमित्ताने जापान मधील टोकियो, ओसाका, क्योतो या अन्य शहरांमध्येही प्रवास व कार्यकर्ता भेटी झाल्या. या सदस्यांच्या गटामध्ये नेतृत्व संवर्धन केंद्रातील श्री. सौगंध देशमुख हे सहभागी होते. त्यांनी पुढील दोन प्रकल्पांचे सादरीकरण केले;

- Impact Evaluation of a Leadership Development Program on UG Students: A Qualitative Study
  सहकारी संशोधक: क्षमाताई दातार, आकाश चौकसे

- A Mixed-Methods Evaluation of a Leadership Development Summer Program for Adolescents with High Intellectual Abilities
  सहकारी संशोधक: शुभंकर केळकर






समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन

# धन्यवाद!


jpnetrutwa

ज्ञान प्रबोधिनी - नेतृत्व संवर्धन केंद्र

netrutwavikas.jnanaprabodhini.org

Jnana Prabodhini Leadership Developement Center

leadershipfc@jnanaprabodhini.org

०२० - २४२०७१७९

पत्ता: ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, महाराष्ट्र, भारत